MHST050003252005

## नियमित दिवाणी दावा क्र.४१३/२००५ मधील नि.२१ खालील आदेश
## पांडूरंग मारुती लोकरे वि. विजय खाशाबा पानस्कर वगैरे

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ व आदेश १४ नियम २(२) अन्वये दाखल केलेला आहे.

२. **अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

वादीची तक्रार गट एकत्रीकरणाचे काम सन १९७१ चे सुमारास होताना गट एकत्रीकरण अधिकारी यांनी, त्या कायद्यातील तरतुदी नुसार गट एकत्रीकरणाचे काम केले नाही अशी आहे. गट एकत्रीकरण कागदोपत्रीच झाले, नोंद एकाची व कब्जा दुस–याचा, गट एकत्रीकरणाप्रमाणे कब्जे दिले गेले नाहीत, अशी तक्रार करुन दावा दाखल केला आहे. मुंबई तुकडे जोड, तुकडे बंदी कायद्याचे कलम ३६अ प्रमाणे गट एकत्रीकरण अधिकारी यांनी त्या कायद्याप्रमाणे गट एकत्रीकरण करुन ती स्कीम जमाबंदी आयुक्त यांनी मंजूर केले नंतर कोणाही रेव्हेन्यु अधिकारी अगर दिवाणी न्यायालयास, मंजूर स्कीम बद्दल ते एकत्रीकरण योग्य आहे की नाही याबाबत निर्णय देण्याचे अधिकार क्षेत्र दिलेले नाही. प्रस्तुत प्रतिवादींनी त्यांचे कैफीयतमध्ये गट एकत्रीकरण कायद्यातील कलम ३६अ प्रमाणे मे.कोर्टास झालेल्या एकत्रीकरणाबद्दल निर्णय देण्याचा अधिकार नाही अशी तक्रार केलेली आहे. त्या तक्रारी गट एकत्रीकरण कायद्यातील वेगवेगळे अधिकारी निर्णय करु शकतात. त्या बाबी बद्दल मे.कोर्टास निर्णय देण्याचे अधिकार क्षेत्र मुळीच नाही. त्यामुळे दावा फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४

नियम २(२) अन्वये प्राथमिक मुद्दा काढून सदरचा दावा काढून टाकणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जास नि.२३ वर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविली आहे. वादीचे म्हणण्यानुसार, प्रतिवादींनी सदरचा दावा गट योजनेसंबंधी आहे अशी गैरसमजुत करुन या अर्जाने अधिकार क्षेत्राबाबतची तक्रार केल्याचे दिसते. परंतु वादीचा दावा हा जाहीर ठराव व ताकीदीकरीता दाखल केलेला आहे व ती दाद देण्याचा अधिकार फक्त दिवाणी कोर्टासच आहेत. एकत्रीकरण योजना बरोबर आहे किंवा नाही हे ठरवून मागण्यासाठी हा दावा मुळीच नाही. उलट एकत्रीकरण योजना व त्यानंतर त्यातील झालेल्या दुरुस्त्यानुसार व प्रत्यक्ष वहिवाटीनुसार रेव्हेन्यु रेकॉर्ड तयार झाले नाही याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र.१ ने लबाडीने मालमत्ता प्रतिवादी क्र.२ व ३ यांना विकल्या व वादीच्या कब्जे वहिवाटीस व मालकी हक्कास प्रतिवादी क्र.२ व ३ हरकत करीत आहेत म्हणून ताकीदीची दाद मागण्यासाठी दावा केला आहे. अर्जाचे कामकाज लांबविण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज केला आहे. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले.

५. सदरचा अर्ज दि.१८.०३.२००६ पासून प्रलंबित आहे. वादी व प्रतिवादी तर्फे युक्तीवाद करण्यात आला नाही. त्यामुळे अर्ज व म्हणणे याच्यातील कथने युक्तीवाद म्हणून ग्राहय धरण्यात आली.

६. सदरचा दावा हा हक्कज्ञापन व मनाईकरीता जरी दाखल केला असला तरी सदर दाव्यामध्ये गट एकत्रीकरणाच्या योजनेबाबत हरकत घेतलेली आहे. प्रतिवादी यांचे

असे कथन आहे की, गट एकत्रीकरणाच्या योजनेस हरकत घेतली असल्यामुळे सदर न्यायालयास हा दावा चालविण्याचे अधिकारक्षेत्र नाही. सदर म्हणण्याचे पृष्टयर्थ प्रतिवादीतर्फे मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खालील न्यायनिर्णय दाखल करण्यात आलेले आहेत.

i) Shraddha Associates & another Vs. St. Patrick's Town Co-operative Housing Society Ltd. & others, 2003(3) Bom.C.R. 814.

ii) Smt. Shakuntala Balwant Gadgil Vs. Smt. Shubhada Suhas Kulkarni, 1985(2) Bom.C.R. 231.

iii) Meher Singh Vs. Deepak Sawhny & another, 1999(1) Bom.C.R. 107 (O.O.C.J.)

iv) Ashok Yeshwant Dhumal deceased by heirs and legal representatives Vs. Shankar Maruti Dhumal & another, 2001(3) Bom.C.R. 27.

v) Gulabrao Bhaurao Kakade (Smt.) since deceased by his heirs and legal representatives Vs. Nivrutti Krishna Bhilare & others, 2001(Supp.) Bom.C.R.688.

vi) Mohammad Hanif Abdul Masjid Isane & others Vs. Juned Mohammad Jalal & others, 2005(1) Bom.C.R. 613.

vii) Mulji Umershi Shah and etc. Vs. Paradisia Builders Pvt. Ltd., Mumbai and others, AIR 1998 Bombay 87.

७. तुर्तातुर्त मनाई अर्जाचे चौकशीच्या वेळीही गट एकत्रीकरण योजनेबाबत युक्तीवाद करण्यात आला. त्यामुळे माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी सदरचे प्रकरण संबंधित खात्याकडे पाठवून अहवाल मागवला. त्यानुसार नि.४२ वर अहवाल दाखल

करण्यात आला. सन १९६९ मध्ये झालेली एकत्रीकरण योजनेची कार्यवाही ही नियमाप्रमाणे झालेली आहे असा अहवाल सादर करण्यात आला. सदर अहवालावर दोन्ही पक्षांचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादींनी अहवाल मान्य केला परंतु वादींनी सदर अहवालाबाबत आजअखेर म्हणणे दिलेले नाही. याचाच अर्थ वादीस नि.४२ वरील अहवाल मान्य आहे. वादी यांनी गट एकत्रीकरण योजनेच्या कार्यवाहीबाबत हरकत घेतल्यामुळे गट एकत्रीकरण कायदा कलम ३६अ नुसार या न्यायालयास सदरचा दावा चालविण्याचे अधिकारक्षेत्र नाही. त्यामुळे सदरचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(डी) प्रमाणे चालणेस पात्र नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. त्या अनुषंगाने नि.१ वर आदेश पारीत करुन दावा फेटाळण्यात येतो.

JYOTI JAGNNATH MANE

Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2026.06.09 16:48:46 +0530

ठिकाण – कराड (जे.जे.माने)
दिनांक – ०९/०६/२०२६ ४ थे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड.